International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# आत्मनिर्भर भारत : संधी, आव्हाने आणि सर्वांगीण विकास

**डॉ. श्रीकांत फुलसुंदर**
*ग्रामोन्नती मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव (पुणे)*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*
*Corresponding Author – डॉ. श्रीकांत फुलसुंदर*
**DOI - 10.5281/zenodo.17970960**

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्था सध्या वेगाने बदलणाऱ्या जागतिक आर्थिक संरचनेत स्वतःचे प्रभावी स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. या पार्श्वभूमीवर "आत्मनिर्भर भारत" ही संकल्पना केवळ आर्थिक धोरण नसून भारताच्या सर्वांगीण, शाश्वत आणि समतोल विकासाचा व्यापक राष्ट्रीय दृष्टिकोन म्हणून उदयास आली आहे. 2020 मधील कोविड-19 महामारीने जागतिक पुरवठा साखळीतील कमकुवतपणा उघड केला आणि भारताला स्वतःच्या संसाधनांवर, तंत्रज्ञानावर, उद्योगांवर आणि कौशल्यसंपन्न मानवबलावर आधारित विकास मॉडेल उभारण्याची आवश्यकता अधोरेखित केली गेली. त्या अनुषंगाने आत्मनिर्भर भारत अभियानाची घोषणा केंद्र शासन स्तरावर झाली आणि स्थानिक उत्पादन, नवोन्मेष, कौशल्य विकास, तंत्रज्ञानाधारित व्यवस्था व रोजगारनिर्मिती यांना प्राधान्य देणारा नवा विकासमार्ग आकार घेऊ लागला.

आत्मनिर्भर भारत ही संकल्पना भारतीय अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, लोकसंख्या शक्ती आणि जागतिक दर्जाची मागणी–पुरवठा साखळी यावर आधारित पाच प्रमुख स्तंभांवर उभी आहे. ही केवळ आर्थिक स्वावलंबनाची घोषणा नसून सामाजिक, तांत्रिक, औद्योगिक, कृषी, सेवा आणि सांस्कृतिक क्षेत्रांचा सर्वंकष समन्वय साधण्याची योजना आहे. या अभियानाचा उद्देश जगापासून अलग होणे नसून, "जगाशी जोडलेले राहून जागतिक स्पर्धेत टिकून राहण्याची क्षमता निर्माण करणे" हा आहे.

प्रस्तुत संशोधन लेखात आत्मनिर्भर भारतासाठी विविध संधी किंव्हा उपलब्धता या अनुषंगाने अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर, आत्मनिर्भर भारताच्या उभारणीपुढील वास्तवातील अडथळे यांचाही आढावा घेतला आहे. एकूणच, भारत एक सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्पर्धक राष्ट्र म्हणून उदयास येण्यासाठी कोणत्या संधी उपलब्ध आहेत आणि कोणती आव्हाने अजूनही अडथळे ठरत आहेत, याचे विश्लेषण या संशोधनातून मांडले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:**

१. आत्मनिर्भर भारत अभियानाचे महत्त्व समजून घेणे,
२. आत्मनिर्भर भारतासाठी विविध संधी किंव्हा उपलब्धता आणि अडथळे यांचाही आढावा घेणे.

**माहिती संकलन:**

माहिती संकलनाच्या दुय्यम प्रस्तुत संशोधन पापेरच्या अनुशंगाने माहिती संकलित केली आहे. यामध्ये आत्मनिर्भर भारत या विषयावर आधारित विविध ग्रंथ,संशोधन लेख व इंटरनेट स्रोतांचा वापर केला आहे.

**आत्मनिर्भर भारत:**

आत्मनिर्भर भारत ही भारताच्या सर्वांगीण विकासासाठीची व्यापक राष्ट्रीय योजना व दृष्टिकोन असून, त्यामध्ये स्थानिक उत्पादन वाढवणे, आयात-निर्भरता कमी करणे, निर्यात वाढवणे, तंत्रज्ञान व कौशल्य विकास, ग्रामीण–शहरी समतोल विकास आणि जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी भारतीय उद्योगांचे सक्षमीकरण यांचा समावेश होतो.

आत्मनिर्भर भारत म्हणजे आर्थिक, सामाजिक, तांत्रिक व धोरणात्मकदृष्ट्या भारताने स्वतःवर जास्तीत जास्त अवलंबून राहणे. याचा अर्थ जगापासून वेगळे राहणे नव्हे, तर जगाशी जोडलेले राहून आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास करून सक्षम देश बनणे. भारताने आपल्याच संसाधनांवर, उद्योगांवर, कौशल्यांवर व नवोन्मेषांवर आधारित मजबूत, स्वावलंबी, प्रगत आणि स्पर्धात्मक बनण्याची प्रक्रिया म्हणजे आत्मनिर्भर भारत होय .

**आत्मनिर्भर भारत अभियानाची उत्पत्ती :**

भारत हा प्रचंड सांस्कृतिक, भौगोलिक आणि मानवी संपत्तीने नटलेला देश आहे. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक विकासाची अनेक धोरणे आखली गेली, परंतु विविध कारणांमुळे भारताला तांत्रिक व औद्योगिक स्तरावर पूर्ण स्वावलंबन मिळू शकले नाही. याच पार्श्वभूमीवर 2020 मध्ये "आत्मनिर्भर भारत" ही संकल्पना नव्या उर्जेसह उदयास आली. ही केवळ सरकारी योजना नसून राष्ट्राच्या सर्वांगीण उभारणीचा, आर्थिक-सामाजिक सुधारणांचा आणि आत्मविश्वासाचा व्यापक दृष्टिकोन आहे. आज आत्मनिर्भर भारत ही संकल्पना भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठीची राष्ट्रीय रणनीती म्हणून ओळखली जाते.

2020 मध्ये कोविड-19 महामारीने संपूर्ण जग हादरवून सोडले. जागतिक पुरवठा साखळी तुटली, आंतरराष्ट्रीय व्यापार ठप्प झाला, उद्योग बंद पडले आणि अनेक देशांना कच्चा माल, औषधे, वैद्यकीय साधने आणि तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेवर मोठा परिणाम झाला. या संकटकाळात भारतालाही आयात-निर्भरतेची तीव्र जाणीव झाली. उदाहरणार्थ - कोविड काळात PPE किट्स, मास्क, व्हेंटिलेटर्स, औषधांचे घटक, इलेक्ट्रॉनिक चिप्स, तंत्रज्ञान यांसाठी भारत इतर देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून होता. या परिस्थितीत भारताला जाणवले की "स्वावलंबनाशिवाय टिकाव नाही." म्हणूनच 12 मे 2020 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत अभियानाची घोषणा केली. 20 लाख कोटी रुपयांच्या पॅकेजद्वारे देशातील उद्योग, शेतकरी, मजूर, गरीब आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राला बळकटी देण्याच्या घोषणा झाल्या.

**आत्मनिर्भर भारत : संकल्पनेचे स्वरूप:**

देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि जागतिक स्तरावर भारताची स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी ही संकल्पना मांडण्यात आली आहे. देशांतर्गत उत्पादनाचा विस्तार, तंत्रज्ञानाचा व्यापक वापर, कौशल्यसंपन्न मानवबल आणि मजबूत पुरवठा साखळी उभारणे हे या संकल्पनेचे मूलभूत उद्दिष्ट आहे. त्यासाठी आत्मनिर्भर भारत ही संकल्पना अर्थव्यवस्था,अधोसंरचना विकास,तंत्रज्ञान आधारित

व्यवस्था,भारताची लोकसंख्या शक्ती तसेच मागणी–पुरवठा साखळी सुधारणा या पाच मुख्य स्तंभांवर आधारित आहे.

आत्मनिर्भर भारत ही केवळ आर्थिक स्वावलंबनाची घोषणा नसून, आर्थिक, तांत्रिक, सामाजिक आणि कौशल्य विकास यांचा एकात्मिक व सर्वसमावेशक दृष्टिकोन आहे. आत्मनिर्भर भारत ही भारताच्या सर्वांगीण, समतोल व शाश्वत विकासाची योजना आहे. आर्थिक बळकटीसह तंत्रज्ञान, कौशल्य, सामाजिक विकास आणि मजबूत पायाभूत सुविधा यांचा समन्वय साधून भारताला जागतिक महासत्ता बनवण्याचा दृढ संकल्प यामागे आहे

**आत्मनिर्भर भारत: संधी आणि उपलब्धता:**

**१) आत्मनिर्भर भारत आणि संविधानिक मूल्ये:**

आत्मनिर्भर भारत अभियानाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे देशाला आर्थिक, तांत्रिक आणि उत्पादन क्षेत्रात स्वावलंबी बनवणे. ही संकल्पना भारतीय संविधानातील अनेक तरतुदींशी सुसंगत आहे. संविधानामध्ये सामाजिक-आर्थिक न्याय, समता आणि प्रतिष्ठा यांवर आधारित राष्ट्रनिर्मितीचे या अनुषगाने मार्गदर्शन करते कि , जे आत्मनिर्भर भारताच्या मूलभूत भूमिकेशी जुळते आहे .

मूलभूत अधिकारांपैकी कलम 19(1)(g) नागरिकांना कोणताही व्यापार , व्यवसाय व उद्योग करण्याचे मुलभूत अधिकार व स्वातंत्र्य प्रदान करते, ज्यायोगे स्टार्टअप, MSME आणि नवउद्यम उद्योगांना चालना देणे शक्य होते. तसेच कलम 14 समानतेचे तत्त्व उद्योगक्षेत्रातील भेदभावरहित धोरणांची पायाभरणी करते. मार्गदर्शक तत्त्वे (DPSP) ही आत्मनिर्भर भारताशी आणखी जवळून जोडलेली आहेत. कलम 43 ग्रामीण उद्योग, खादी, ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देते. कलम 47 आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी राज्याची जबाबदारी अधोरेखित करते. या सारखे अनेक कलम भारताच्या विकासाशी संबंधित आहे.

सद्यस्थितीत भारतासमोर आत्मनिर्भर होण्यासाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. जागतिक पुरवठा साखळीचे पुनर्स्थापन, डिजिटल अर्थव्यवस्थेचा वेगवान विस्तार, स्टार्टअप क्रांती, तसेच संरक्षण क्षेत्रातील स्वदेशीकरण—या सर्व क्षेत्रांत भारताची क्षमता दिवसेंदिवस वाढते आहे. एकूणच, संविधानिक मूल्ये आणि आधुनिक विकास धोरणे यांचा मेळ साधणारा आत्मनिर्भर भारत हा भारताच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीचा आधारस्तंभ ठरत आहे.

**२) आत्मनिर्भर भारतासाठी भारतीय सांस्कृतिक वारसा :**

भारतीय सांस्कृतिक वारसा हा आपल्या राष्ट्राची ओळख, अभिमान आणि प्रेरणास्रोत आहे. आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी या वारशाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय परंपरा, कला, हस्तकला, योग, आयुर्वेद, लोकउद्योग आणि स्थानिक ज्ञानपरंपरा या आपल्या विकासाचे भक्कम आधारस्तंभ आहेत.

हा सांस्कृतिक वारसा समाजात स्वदेशी मूल्यांविषयी आत्मविश्वास निर्माण करतो. 'वोकल फॉर लोकल' या संकल्पनेला चालना देत स्थानिक उद्योग, कारागीर आणि हस्तकौशल्याला नवे सामर्थ्य दिले जाते . परिणामी ग्रामीण व लघुउद्योग क्षेत्रात रोजगारनिर्मिती वाढते आणि आर्थिक स्वावलंबनाची पायाभरणी मजबूत होते.

भारतीय वारसाधारित योग, आयुर्वेद, मसाले, वस्त्रे आणि लोककला या उत्पादनांची जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी असल्याने निर्यातवृद्धी होते, त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. तसेच ऐतिहासिक स्थळे, परंपरा व उत्सव यांमुळे सांस्कृतिक पर्यटन वाढून आर्थिक विकासाला नवी गती मिळते.

पारंपरिक ज्ञान आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडल्यास संशोधन व नवोन्मेषाला वाव मिळतो, तर संस्कारमूल्ये आणि एकात्मता समाजाला टिकाऊ विकासाकडे नेतात. त्यामुळे भारतीय सांस्कृतिक वारसा हा आत्मनिर्भर भारताचे सामर्थ्य, ओळख आणि भविष्य घडविणारा मूलाधार ठरत आहे.

**३) आत्मनिर्भर भारतासाठी युवाशक्ती :**

आत्मनिर्भर भारत अभियानाचा मुख्य उद्देश देशाला आर्थिक, तांत्रिक आणि औद्योगिक क्षेत्रात स्वावलंबी बनवणे हा आहे. या ध्येयाच्या पूर्ततेसाठी भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे भारतातील *युवाशक्ती*. देशातील 60% पेक्षा अधिक लोकसंख्या ही तरुणांची असल्याने देशातील युवाशक्ती भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी योगदान देऊ शकते .परंतु त्यासाठी प्रथम, युवांनी कौशल्यावृद्धी करून आधुनिक तंत्रज्ञानाशी स्वतःला जोडणे अपेक्षित आहे. Skill India, Digital India यांसारख्या योजनांचा लाभ घेऊन कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), रोबोटिक्स, माहिती तंत्रज्ञान (IT), ड्रोन तंत्रज्ञान यामध्ये तज्ज्ञता मिळवणे महत्त्वाचे आहे. आजच्या तरुणांनी उद्योजकता स्वीकारून नोकरी शोधणारे नसून नोकरी निर्माण करणारे बनावे. स्टार्टअप इंडिया, MSME सारख्या योजना यामुळे तरुण उद्योजकांसाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. तसेच या अनुषंगाने स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि Vocal for Local या संकल्पनेला बळकटी देणे ही देखील तरुणांची जबाबदारी आहे.

सद्यस्थितीत युवांसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा स्टार्टअप हब असून FinTech, EdTech, AgriTech आणि HealthTech सारख्या क्षेत्रांत अपार संधी आहेत. डिजिटल भारतामुळे UPI, ONDC आणि नवीन तंत्रज्ञान क्षेत्रांत रोजगाराच्या व उद्यमाच्या मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. तसेच Make in India अंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स, ड्रोन, संरक्षण, उत्पादन क्षेत्रात तरुण अभियंत्यांना विस्तृत संधी उपलब्ध आहेत.

एकूणच, भारतीय युवाशक्ती ही आत्मनिर्भर भारताच्या पाया मजबूत करणारी सर्वात महत्त्वाची शक्ती आहे. नवोन्मेष, कौशल्य, देशभक्ती आणि उद्यमशीलता यांद्वारे तरुणच भारताला खऱ्या अर्थाने आत्मनिर्भरतेकडे नेऊ शकतात.

**४) आत्मनिर्भर भारत आणि कृषीचे महत्त्व :**

भारताचे कृषी क्षेत्र हे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक रचनेचे प्रमुख आधारस्थान आहे. कृषी व कृषिपूरक क्षेत्रांचे देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादन (GDP) मध्ये सुमारे **18% योगदान** असून **46% पेक्षा अधिक लोकसंख्या** या क्षेत्रावर अवलंबून आहे. कृषीचा विकास आत्मनिर्भर भारतासाठी पूरक आहे कारण कृषी ही केवळ उत्पादनाची नव्हे तर रोजगार आणि जीवननिर्वाहाचे महत्वाचे महत्वाचे आहे.

भारताची कृषी अर्थव्यवस्था **अत्यंत वैविध्यपूर्ण** आहे. धान्यांबरोबरच फळे-भाज्या, कडधान्ये, कापूस, ऊस, दुग्धउद्योग, मत्स्य, पशुपालन, बागायती पिके अशा विविध उत्पादनांमुळे कृषी अधिक लवचिक व शाश्वत बनते. ही विविधता ग्रामीण उद्योग, खाद्य-प्रक्रिया, कापड उद्योग, दुग्धउद्योग आणि निर्यात यांना सतत कच्चामाल पुरवते.

अलीकडील काळात कृषी क्षेत्रात **पायाभूत सुविधांचा मोठा विकास** घडला आहे. सुधारित बियाणे, आधुनिक यंत्रसामग्री, सूक्ष्म-सिंचन, कोल्ड स्टोरेज, वेअरहाऊसिंग, पोस्ट-हार्वेस्ट तंत्रज्ञान आणि कृषी संशोधनात सातत्यपूर्ण गुंतवणूक यामुळे उत्पादनक्षमता वाढत आहे. शासनाच्या धोरणांमुळे विपणन, निर्यात, प्रक्रिया उद्योगांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळत आहे.

या सर्व अनुषंगाने, आत्मनिर्भर भारतासाठी कृषी क्षेत्र महत्वाचे ठरते आहे. विविध उत्पादन, ग्रामीण संसाधने, उद्योगांना कच्चामाल, मोठ्या प्रमाणातील रोजगार आणि अन्नसुरक्षा यामुळे भारताची आर्थिक व सामाजिक स्वावलंबनाची पायाभरणी कृषीक्षेत्रातूनच मजबूत होते. योग्य गुंतवणूक आणि तंत्रज्ञान वापरल्यास आत्मनिर्भर भारताचे स्वप्न अधिक वेगाने साकार होऊ शकते.त्यासाठी कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण पायाभूत सुविधांचा विकास करून भारताला आत्मनिर्भर बनविण्याची संधी भारताजवळ आहे.

**५) मानवी भांडवल उपलब्धता आणि आत्मनिर्भर भारत:**

भारताचे मानवी भांडवल हे देशाच्या सर्वात मोठ्या संपत्तींपैकी एक आहे. भारताची सुमारे 68% लोकसंख्या कार्यप्रवण वयोगटात असून यामध्ये तरुणाचे प्रमाण अधिक आहे. ही तरुण लोकसंख्या देशाच्या उत्पादनक्षमता, नवोन्मेष आणि आर्थिक विकासासाठी निर्णायक भूमिका बजावू शकते. 2024 पर्यंत भारतातील एकूण कामगारसंख्या 64 कोटींपेक्षा अधिक झाली आहे की, ज्यातून देशात दिवसेंदिवस औपचारिक आणि अनौपचारिक रोजगारात वाढ होत आहे.

माहिती तंत्रज्ञान (IT) क्षेत्रात, भारताकडे 50 लाखांहून अधिक कौशल्ययुक्त तंत्रज्ञान कर्मचारी आहेत. AI, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा आणि फिनटेकसारख्या क्षेत्रात तरुणांसाठी मोठ्या संधी निर्माण होत आहेत. भारतात *Infosys, TCS, Wipro* यांसारख्या कंपन्या लाखो रोजगार देत असून स्टार्टअप्स उद्योगांना चालना मिळत आहे.

निर्माण क्षेत्रात Make in India आणि PLI योजनांमुळे ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स, मोबाईल निर्मिती, ड्रोन टेक्नॉलॉजीमध्ये रोजगार वाढला आहे. iPhone उत्पादन भारतात वाढल्याने हजारो रोजगार निर्माण झाले.

सेवा क्षेत्रात हेल्थकेअर, शिक्षण, BPO, पर्यटन व ई-कॉमर्समुळे लाखो तरुणांना जागतिक स्तरावरील संधी मिळत आहेत.

कृषी व कृषिपूरक क्षेत्रात 46% पेक्षा जास्त लोकसंख्या कार्यरत असून, ॲग्रीटेक, अन्न-प्रक्रिया, ड्रोन सिंचन, FPO मॉडेल यामुळे ग्रामीण भागात नव्या स्वरोजगाराच्या संधी वाढत आहेत.

उद्योजकता हे भारताच्या मानवभांडवलाचे मोठे बलस्थान आहे. MUDRA, Startup India यांच्या मदतीने लाखो तरुणांनी व्यवसाय सुरू केले.

थोडक्यात , कौशल्ययुक्त व नवकल्पनाशील मानवभांडवल हे आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी सर्वात मोठे बळ ठरत असते.

**६) आत्मनिर्भर भारतसाठी पर्यटन क्षेत्राची भुमिका :**

भारतातील पर्यटन क्षेत्र देशाच्या आर्थिक विकासात आणि आत्मनिर्भरतेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. 2023–24 मध्ये पर्यटन क्षेत्राचे GDP मध्ये योगदान 5.22% असून, जवळपास 84.63 मिलियन लोकांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. त्या वर्षी 25.09 करोड घरगुती पर्यटन भेटी आणि 20.94 मिलियन परदेशी पर्यटक भेटी नोंदल्या गेल्या, ज्यातून परकीय चलनात 28.077 बिलियन USD मिळाले.

सरकारच्या योजनांमुळे Swadesh Darshan, PRASHAD, Tourism Infrastructure Development Assistance पर्यटन स्थळांवर पायाभूत सुविधा, स्वच्छता, लॉजिंग, वाहतूक, माहिती सेवा, साहसी पर्यटन सुविधा यांचा विकास झाला आहे. या सुविधांमुळे ग्रामीण आणि

स्थानिक भागात रोजगार आणि उद्योग संधी वाढल्या आहेत.

पर्यटनामुळे स्थानिक हस्तकला, खाद्यसंस्कृती, सांस्कृतिक वारसा यांना आर्थिक आधार मिळतो. तसेच, पर्यटन सेवाक्षेत्रावर आधारित उद्योग विदेशी अवलंबित्व कमी करून स्थानिक आर्थिक स्वावलंबन वाढवतात. उदाहरणार्थ, आज भारतात काश्मीर,देहरादून ,केरला,जयपूर मधील अनेक पर्यटन केंद्रांनी स्थानिक रोजगार, हॉटेलिंग, गाइडिंग, अन्न-सेवा उद्योगांसह आर्थिक वाढ साधली आहे.

एकूणच, भारतातील विकसित पर्यटन सोयी-सुविधा, वैविध्यपूर्ण पर्यटन पर्याय, आणि मोठा पर्यटक प्रवाह हे आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टासाठी आर्थिक, सामाजिक आणि रोजगार सृजनात्मक संधी निर्माण करतात.

### ७) आत्मनिर्भर भारत आणि औद्योगिक क्षेत्राची भूमिका:

आत्मनिर्भर भारत धोरणाचा उद्देश देशांतर्गत उत्पादन वाढवणे, आयात-निर्भरता कमी करणे, जागतिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि भारताला जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाचे स्थान मिळवून देणे हा आहे.

परकीय थेट गुंतवणूक (FDI) ही भारताच्या औद्योगिक वाढीची एक मोठी ताकद बनली आहे. 2024–25 आर्थिक वर्षात भारताला US$ 81.04 अब्जपरकीय थेट गुंतवणूक (FDI) प्राप्त झाली असून ही वर्षानुवर्षे 14% वाढ आहे. यातील US$ 19.04 अब्ज इतकी गुंतवणूक केवळ उत्पादन क्षेत्रात झाली, जी 18% वाढ दर्शवते. ही वाढ भारतीय उत्पादनक्षमता आणि आत्मनिर्भर धोरणांवर जागतिक गुंतवणूकदारांचा मजबूत होण्यास मदत दर्शवते.

उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणात नवनवीन उत्पादने आणि रोजगार निर्मिती होत आहे. विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती, वैद्यकीय उपकरणे, वाहन भाग इत्यादी क्षेत्रांमध्ये औद्योगिक उत्पादन निर्देशांक (IIP) देखील अनेक महिन्यांत 5% पेक्षा जास्त वाढ दर्शवत आहे,

आत्मनिर्भर भारताच्या धोरणांमुळे उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्याने निर्यातीमध्येही सकारात्मक वाढ होत असून अनेक उच्च-तंत्रज्ञान उत्पादनांची निर्यात वाढली आहे, ज्यामुळे भारताची जागतिक स्पर्धात्मकता बळकट होत आहे. 'Make in India' आणि उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना (PLI) योजना'मुळे MSMEs पासून मोठ्या उद्योगांपर्यंत सर्वांना उत्पादन वाढवण्यासाठी प्रोत्साहन मिळत आहे. PLI अंतर्गत अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक व रोजगार निर्माण होत आहे.

रोजगार निर्मिती हे आत्मनिर्भर भारताचे आणखी एक प्रभावी परिणाम आहे. उत्पादन क्षेत्र विस्तारत असल्याने लाखो कुशल आणि अर्ध-कुशल कामगारांना नवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. ग्रामीण आणि शहरी, दोन्ही भागांमध्ये आर्थिक गतिशीलता वाढत आहे.

### ८) भारतातील बाजारपेठा, आयात-निर्यात क्षेत्र आणि आत्मनिर्भर भारत :

वित्तीय वर्ष 2024-25 मध्ये भारताची एकूण निर्यात **USD 824.9 बिलियन** पर्यंत वाढली असून, इलेक्ट्रॉनिक्स, इंजिनीअरिंग गुड्स, रेडीमेड गारमेंट्स, फार्मास्यूटिकल्स यांसारख्या क्षेत्रात विशेष वाढ दिसली. त्या वेळी आयातही मोठ्या प्रमाणात असली तरी, निर्यात-क्षमतेमुळे भारत जागतिक उत्पादन साखळीचा महत्त्वाचा भाग बनला आहे.परिणामी भारताची बाजारपेठ आणि निर्यात-क्षमता देशाला आत्मनिर्भर भारत बनवण्यासाठी मोठी संधी देतात.

देशातील वाढती लोकसंख्या आणि मध्यम वर्गामुळे घरगुती वस्तूंना मोठी मागणी आहे, ज्यामुळे स्थानिक उत्पादनासाठी संधी वाढते. “आयात-प्रतिस्थापन” धोरणानुसार, जी वस्तू आता आयात केली जात आहे, ती भारतातच तयार केल्यास परकीय अवलंबित्व कमी होते, रोजगार वाढतो आणि देशी उद्योगाला चालना मिळते. उदाहरणार्थ, iPhone, इलेक्ट्रॉनिक वस्तू व इंजिनीअरिंग उत्पादनांचा काही भाग भारतात तयार करून निर्यात वाढवली जात आहे.

या प्रक्रियेत रोजगार निर्मिती, परकीय चलन मिळवणे, स्थानिक उद्योगांचा विकास, आणि आर्थिक स्वावलंबन साधणे शक्य होते. भारताच्या विशाल बाजारपेठेतील मागणी, कौशल्ययुक्त कामगार आणि निर्यात-क्षम उद्योग यांचा समन्वय ठेवून देश आत्मनिर्भर भारताच्या उद्दिष्टाकडे दृढपणे वाटचाल करू शकतो.

थोडक्यात भारतीय बाजारपेठ नियंत्रित करून देशाला आत्मनिर्भरतेच्या दिशेला नेता येईल परंतु त्याकरिता योग्य नियोजनाची गरज आहे.

**आत्मनिर्भर भारत : अडथळे / आव्हाने:**

**१) संविधानिक तरतुदींची प्रभावी अंमलबजावणीतील कमतरता:**

जरी संविधानिक मूल्ये–समता, सामाजिक-आर्थिक न्याय, उद्योग स्वातंत्र्य हे आत्मनिर्भर भारतासाठी भक्कम आधार असले , तरीही त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत आजही असमानता आहे. उदाहरणार्थ, उद्योग नोंदणी, जमीन अधिग्रहण, परवानगी प्रक्रियेतील गुंतागुंत, भ्रष्टाचार, विविध राज्यांतील धोरणांतील विसंगती यामुळे उद्योगांची स्थापना कठीण बनते. त्यामुळे संविधानिक आधार असूनही, धोरणांची प्रभावी अंमलबजावणी ही मोठी अडचण आहे.

**२) सांस्कृतिक वारशांचा व्यापारीकरणास अडथळा आणि तंत्रज्ञानातील मागासलेपणा :**

भारताचा सांस्कृतिक वारसा जगभर प्रसिद्ध असला तरी हस्तकला, हातमाग, आयुर्वेद, लोककला यासारख्या क्षेत्रांत आधुनिक मार्केटिंग, ब्रँडिंग, प्रमाणन (standardization) यांची कमतरता आहे. कारागिरांना वित्त, प्रशिक्षण, ई-कॉमर्स सुलभता उपलब्ध नसल्याने ते जागतिक स्पर्धेत मागे पडतात. भौगोलिक मानांकन (GI) असलेली अनेक उत्पादने सुद्धा योग्य पुरवठा साखळीअभावी व्यापारात पिछाडीवर आहेत. त्यामुळे सांस्कृतिक वारसा हा संधी असूनही, बाजारपेठ ठरण्यातील अडथळे प्रबळ आहेत.

**३) कौशल्य आधारित युवाशक्तीमधील दरी (Skill Gap):**

भारताकडे विशाल तरुण लोकसंख्या असूनही, उद्योगांना आवश्यक तांत्रिक, डिजिटल, संशोधनाधारित कौशल्ये फार कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. NSDC च्या अहवालानुसार प्रशिक्षित कामगारांचे प्रमाण अनेक विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. रोबोटिक्स, AI, ड्रोन, सायबर सुरक्षा अशा क्षेत्रांत मागणी जास्त असून पुरवठा कमी आहे. ग्रामीण-शहरी कौशल्यांची दरी, अप्रचलित अभ्यासक्रम, उद्योग-शैक्षणिक संस्थांतील कमी सहकार्य हे अडथळे युवाशक्तीचा संपूर्ण उपयोग होऊ देत नाहीत.

**४) कृषी क्षेत्रातील संरचनात्मक कमकुवतपणा:**

कृषी क्षेत्र हि भारताची ताकद असली तरी आत्मनिर्भर भारताच्या दिशेने अनेक आव्हाने अडथळे आहेत. सिंचन सुविधांची मर्यादा, पावसावर अवलंबित्व, जमिनीचे तुकडीकरण, तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर, पोस्ट-हार्वेस्ट लॉस , साठवण सुविधांचा अभाव, बाजारातील अस्थिरता यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादनक्षमतेवर परिणाम होतो. कृषी उत्पादन असूनही

प्रक्रिया उद्योगाकडे वळण कमी असल्याने मूल्यवर्धनही मर्यादित राहते. त्यामुळे कृषीचे सामर्थ्य पूर्ण क्षमतेने वापरता येत नाही.

**५) मानवी भांडवलाची असमान गुणवत्ता आणि रोजगारातील विसंगती:**

भारतामध्ये कामगारांची संख्या मोठी असली तरी "योग्य कौशल्ययुक्त" कामगारांची उपलब्धता असमान आहे. अनेक उद्योगांना कुशल कामगारांची कमतरता जाणवते, तर लाखो तरुण नोकरीच्या शोधात (Employment Paradox) असतात. आरोग्य, शिक्षण, पोषण, डिजिटल साक्षरता यातील कमतरता मानवभांडवलाची गुणवत्ता कमी करते. परिणामी उत्पादन, संशोधन, नवोन्मेष व जागतिक स्पर्धेत देशाची प्रगती मंदावते.

**६) पर्यटन क्षेत्रातील पायाभूत सुविधांची असमानता:**

पर्यटन क्षेत्र आर्थिकदृष्ट्या महत्वाचे असूनही ग्रामीण आणि अर्धशहरी भागात मूलभूत सुविधा–स्वच्छता, वाहतूक, सुरक्षा, आपत्कालीन सेवा अपर्याप्त आहेत. अनेक संभाव्य पर्यटन स्थळे योग्य व्यवस्थापनाअभावी विकसित होत नाहीत. हंगामी रोजगार, प्रशिक्षित मार्गदर्शकांची कमतरता, डिजिटल बुकिंगचा अभाव, स्थानिक व्यवसायांच्या मर्यादित क्षमता यामुळे पर्यटन क्षेत्राचे सामर्थ्य वापरले जात नाही आणि आत्मनिर्भरतेकडे त्या दृष्टीने पहिले जात नाही.

**७) औद्योगिक क्षेत्रातील तांत्रिक अवलंबित्व आणि MSME साठी अडथळे:**

जरी PLI आणि Make in India मुळे उद्योगांना चालना मिळाली असली तरी अत्याधुनिक यंत्रसामग्री, सेमिकंडक्टर, उच्च गुणवत्ता स्टील, प्रिसिजन उपकरणे यांसाठी आयातीवर अवलंबित्व कायम आहे. MSME क्षेत्राला मिळणारे कर्ज महाग, डिजिटलायझेशन कमी आणि तंत्रज्ञान अद्ययावत करण्याची क्षमता मर्यादित आहे. पुरवठा साखळीतील विस्कळीतपणा आणि कच्चामालाचा वाढता खर्चही उद्योगांना स्पर्धात्मक बनू देत नाही.:

**८) निर्यात वाढ परंतु जागतिक स्पर्धेतील अडथळ्यांचा प्रभाव:**

भारतीय अर्थव्यवस्थेत निर्यात क्षमता वाढत असली तरी भारताची स्पर्धा चीन, व्हिएतनाम, दक्षिण कोरिया यांच्यासारख्या कमी खर्च आणि उच्च उत्पादकतेच्या देशांशी आहे. लॉजिस्टिक खर्च भारतात जास्त (GDP च्या 13–14%) आहे, कि जे जागतिक स्पर्धेत मोठी अडचण ठरते. सीमाशुल्क प्रक्रिया, पॅकेजिंग, जागतिक मानकांचे पालन यातील अडथळ्यांमुळे भारतातील अनेक उत्पादने जागतिक बाजारात सहजपणे प्रवेश करू शकत नाहीत.

**९) तंत्रज्ञानातील संशोधन व पेटंट क्षेत्रातील पिछाडी**

भारताचा संशोधनावरील खर्च GDP च्या फक्त सुमारे 0.7% आहे, जे विकसित देशांच्या तुलनेत अत्यल्प आहे. अकादमिक संस्थांचे उद्योगांशी मर्यादित सहकार्य, शांतपणे labs-to-market प्रक्रिया, पेटंट नोंदणी प्रक्रिया क्लिष्ट आणि महाग असल्याने नवोन्मेष दडपले जातात. स्थानिक उत्पादन वाढवायचे असल्यास उच्च स्तरीय तंत्रज्ञान विकास आवश्यक आहे, ज्यात भारताला अजून मोठे पाऊल टाकावे लागेल.अर्थातच आत्मनिर्भरतेसाठी संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे.

**१०) धोरणात्मक सातत्य आणि केंद्र–राज्य समन्वयातील मर्यादा:**

परंतु अनेक प्रकल्पांमध्ये धोरणांमध्ये बदल, वेगवेगळ्या राज्यांचे विविध उद्योग नियम, कररचना, परवानग्या, जमीन उपलब्धता यातील असमानता ही गुंतवणुकीसाठी अडचण ठरते. केंद्र–राज्य समन्वय नसल्याने अनेक विकास योजना अपेक्षित परिणाम देऊ शकत नाहीत.त्यासाठी, आत्मनिर्भर भारतासाठी धोरणांची दीर्घकालीन स्थिरता आवश्यक आहे

**सारांश :**

"आत्मनिर्भर भारत" ही भारताच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठीची व्यापक राष्ट्रीय दृष्टी असून, कोविड-19 नंतर देशाने स्वदेशी उत्पादन, कौशल्यविकास आणि तंत्रज्ञानाधारित विकासमार्ग स्वीकारण्याची गरज ओळखली गेली. आज औद्योगिक, कृषी, पर्यटन, डिजिटल तंत्रज्ञान व उद्योजकता क्षेत्रांत भारताला व्यापक संधी उपलब्ध आहेत. तरुणांची उद्यमशीलता, मानवभांडवल, सांस्कृतिक वारसा आणि मोठी बाजारपेठ ही आत्मनिर्भरतेची प्रमुख बलस्थाने आहेत. तथापि कौशल्य दरी, उद्योग क्षेत्रातील तांत्रिक अवलंबित्व, कृषीतील संरचनात्मक समस्या, MSME साठी वित्तीय अडथळे आणि संशोधन–नवोन्मेषातील मागासलेपणा ही मोठी आव्हाने आहेत. या संधी आणि अडथळ्यांचा संतुलित विचार करून तंत्रज्ञान, कौशल्य, धोरणात्मक स्थिरता आणि पायाभूत सुविधा मजबूत केल्यास भारत जागतिक पातळीवर सक्षम आणि स्वावलंबी राष्ट्र म्हणून उदयास येऊ शकतो.

**संदर्भ :**


1. दांडेकर, वि. म., *भारतीय अर्थव्यवस्था : विकासाची वाटचाल,* प्रकाशित संवाद प्रकाशन. नागपूर, 2018. ISBN: 978-9381234568
2. कर्णिक, सुभाष. *भारतीय अर्थव्यवस्था: सिद्धांत आणि व्यवहार.* मुंबई: फडके प्रकाशन. 2020.
3. देशमुख, आर. एम. *भारतीय कृषी अर्थव्यवस्था.* विदर्भ साहित्य संघ. नागपूर, 2019.
4. पाटील, संजय. *पर्यटन विकास आणि भारत.* निरंजन प्रकाशन. कोल्हापूर, 2021. ISBN: 978-9387445679
5. कुलकर्णी, सतीश. *संविधान आणि आर्थिक धोरणे.* नाथ प्रकाशन. मुंबई, 2016. ISBN: 978-8184993214
6. अमृतांगना, प्रा. हर्षदा. *भारतीय सांस्कृतिक वारसा व स्वावलंबन.* डायमंड पब्लिकेशन्स. पुणे. 2020. ISBN: 978-9350834561
7. Government of India. *Economic Survey of India 2023–24.* Ministry of Finance, New Delhi. 2024. ISBN: 978-9386228975
8. Government of India. *Aatmanirbhar Bharat Abhiyan: Policy Document.* Ministry of Commerce & Industry. New Delhi. 2021.
9. NITI Aayog. *India@75: Strategy for New India.* Government of India. 2020. ISBN: 978-8171889270
10. Krishnamurthy, R. & Sharma, A. *Industrial Development and Competitiveness in India.* Sage Publications, New Delhi. 2022. ISBN: 978-9354793154
11. https://aatmanirbharbharat.mygov.in/
12. https://en.wikipedia.org/wiki/Atmanirbhar_Bharat
13. https://en.wikipedia.org/wiki/Atmanirbhar_Bharat